प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
ई-मेल/email: helpdoc@rbi.org.in

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
**Department of Communication**, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 022- 22660502

26 नोव्हेंबर 2020

**बँकिंग विनियमन अधिनियम, 1949 (एएसीएस), कलम 35 A अंतर्गत निदेश- रूपी को-ऑपरेटिव बैंक लिमिटेड, पुणे, महाराष्ट्र - कालावधी वाढविणे**

भारतीय रिझर्व बँकेने दिनांक फेब्रुअरी 21, 2013 रोजी दिलेल्या निर्देश सं. UBD.CO.BSD I/D-28/12.22.218/2012-13 च्या अनुषंगाने रूपी को-ऑपरेटिव बैंक लिमिटेड, पुणे, महाराष्ट्र वर दिनांक फेब्रुअरी 22, 2013 ची कार्यालयीन वेळ संपल्यापासून दिशानिर्देश लादण्यात आले होते. या नियमावलीचा कालावधी वेळोवेळी वाढवण्यात आला असून आता 30 नोव्हेंबर 2020 पर्यंत हे नियम लागू राहतील.

2. जनतेच्या माहितीसाठी सुचना देण्यात येत आहे की, भारतीय रिझर्व बँक, बँकिंग विनियमन अधिनियम, 1949 (सहकारी सोसायटीना यथालागू) कलम 56 चे वाचन करीता, कलम 35A चे उप कलम (1) अनुसार, आपल्या प्रदत्त अधिकाराचा वापर करून असा आदेश देत आहे की उपरोक्त दिशानिर्देशचा कालावधि हा दिनांक नोव्हेंबर 24, 2020 च्या सुधारित निर्देश सं. DOR.AID/D-35/12.22.218/2020-21 द्वारा फेब्रुवारी 28, 2021 पर्यंत वाढवण्यात आला आहे, जो बँकेच्या आर्थिक आढाव्यावर पुनरावलोकनाधीन असेल.

3. संदर्भाधीन निर्देशातील इतर कोणत्याही नियम आणि अटी बदललेल्या नाहीत. दिनांक नोव्हेंबर 24, 2020 च्या सुधारित निर्देशाची प्रत बँकेच्या आवारात जनतेच्या माहितीसाठी लावण्यात आलेली आहे.

4. भारतीय रिझर्व बँकेच्या उपरोक्त मुदत वाढीमुळे आणि/किंवा निर्देशातील परिवर्तनामुळे जनतेने असे गृहीत धरू नये की, बँकेच्या सुधारलेल्या आर्थिक स्थितीवर भारतीय रिझर्व बँक समाधानी आहे.

**(योगेश दयाल)**
मुख्य महाप्रबंधक

**प्रेस प्रकाशनी: 2020-2021/691**